बीड ■ वर्ष ४ ■ अंक २२८ ■ मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५ ■ पोस्टल दिनांक १६ एप्रिल २०२५ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-4 ■ Issue-228 ■ Tuesday 15 April 2025 ■ Postal Date 16 April 2025 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

# स्विमिंग पूलमध्ये झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या कंत्राटदार डायगव्हाणेवर गुन्हा दाखल करा?

सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..

बीड किसान

• संपादक : शेख कामरान •




## पाच–पाच प्रशिक्षक तैनात असून विद्यार्थी सहा फुट खोल पाण्यात बुडतो कसा; पोहोणाऱ्या लोकांच्या तोंडात अक्षरशा: शेवाळ जातयं स्विमिंग पूलाची सफाई होत नाही जिल्हा क्रीडा विभाग तपासणी ही करत नाही

**बीड | किसान न्युज**

दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी स्टेडियम मध्ये असलेल्या स्विमिंग पूल मध्ये बीड मधील इंजीनियरिंग महाविद्यालयातील एका अठरा वर्षीय तरुणाचा बुडून दुर्दैवीरीत्या मृत्यू झाला. पोलिसांनी याबाबत आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे मात्र त्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या स्विमिंग पूल ची संपूर्ण तपासणी होण्याची गरज असून, कंत्राटदार असलेले डायगव्हाणे याला किती जबाबदार आहेत या बाबी पोलिसांनी तपासाव्यात आणि यातील दोषी शोधून त्यावर आरोप निश्चित करावेत अशी मागणी होत आहे.

बीड मधील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिक्षण घेणारा उदगीर तालुक्यातील सतीश कांबळे नावाचा अठरा वर्षीय विद्यार्थी आणि त्याचे मित्र दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारच्या वेळी स्टेडियम परिसरात असलेल्या स्विमिंग पूल मध्ये पोहण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी सतीश कांबळे याचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या मृत्यूबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एक तर हे विद्यार्थी शासकीय महाविद्यालयात शिक्षण घेत होते आणि त्याच ठिकाणी हॉस्टेलला राहत होते. त्या ठिकाणी निवासी असलेले विद्यार्थी विनापरवाना बाहेर कसे गेले असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दुसरीकडे विद्यार्थी ज्यावेळी या ठिकाणी पोहोत होता त्यावेळी स्विमिंग पूल च्या कंत्राटदारांचे प्रशिक्षक काय करत होते ? प्रशिक्षक यांनी तेथे पोहण्यास आलेल्या प्रत्येकावर नजर ठेवण्याची जबाबदारी असते. कोणताही व्यक्ती बुडत असताना कमीत कमी चार पाच मिनिटाचा कालावधी लागतो. उघड्या डोळ्यांनी हे पाहता येते मग प्रशिक्षक काय करत होते. यातील काही प्रशिक्षक हे नियमित पाण्यात असायला हवेत तसे ते पाण्यामध्ये होते का ? » पान २ वर

- कंत्राटदार डायगव्हाणे खालील मुद्द्यावरून जबाबदार ठरतात...
- स्विमिंग पूल च्या पाण्याची क्वालिटी कशी आहे
- किती प्रशिक्षक आहेत आणि ते काय काम करतात
- पोहण्यासाठी लहानापासून थोरापर्यंत जेवढी संख्या येते त्या प्रमाणात प्रशिक्षक आहेत का?
- पाण्याची स्वच्छता कोणकोणत्या वेळेत केली त्याचा अहवाल आहे का?
- नेमलेले प्रशिक्षक ईमाने इतबारे काम करतात का आणि ते प्रशिक्षित आहेत का ?
- शासकीय नियमाप्रमाणे स्विमिंग पूलचे ऑडिट झाले आहे का?
- पाण्यामध्ये शेवाळ साचले असून पाणी हिरवे झाल्याच्या तक्रारी आहेत त्या कशामुळे
- या सगळ्या बाबी तपासल्या गेल्या तर कंत्राटदार डायगव्हाणे हे जबाबदार ठरतात. त्यांनी या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देणे क्रमप्राप्त आहे आणि पोलिसांनी त्याच्यावर लक्ष देण्याची गरज आहे.

# लाडक्या बहिणींना फक्त ५०० रुपयेच..!

### या लाडक्या बहिणींची संख्या ८ लाखांच्या घरात

**मुंबई | किसान न्युज**

विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आलेली लाडकी बहीण योजनेवर पुन्हा एकदा टाच झाली आहे. या योजनेच्या माध्यमातून ज्या महिलांना आर्थिक मदत केली जाते, त्याच महिलांची नावे नमो शेतकरी सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये देखील आहेत. अशा आठ लाख महिलांना आता दीड हजार रुपये ऐवजी पाचशे रुपये महिना मिळणार आहे. या योजनेतील अटीनुसार दोन योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे आता या महिलांचे पैसे कमी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या आठ लाख महिलांना आता लाडकी बहीण योजनेचा हप्ता कमी मिळणार आहे. या महिलांना दीड हजार रुपये ऐवजी पाचशे रुपये या महिन्यापासून मिळणार आहेत. लाडकी बहीण योजनेतील नियमानुसार एका सरकारी योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलेला » पान २ वर

# गायरानाला लागलेल्या आगीत सीताफळ बाग जळून खाक



### यामध्ये बागे सह ठिबक संच, पाइपलाइन आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने ५ लाखांचे नुकसान

**आडस | किसान न्युज**

केज तालुक्यातील आडस, कळमअंबा,मुलेगाव सिमेवरील गायरानला सोमवारी (दि.१४) सकाळी ११ वाजता आग लागून यामध्ये आडस येथील शेतकऱ्याची पाच वर्षांपूर्वीची सीताफळ बाग, ठिबक संच आणि पाइपलाइन जळून अंदाजे ५ लाखांचे आर्थिक नुकसान झाले. तर विहिरी, बोअर कोरडे ठाक पडल्याने शेतकऱ्यांनी झाडाच्या फांद्या तोडून त्याने आग विझवली पण तोपर्यंत जवळपास १०० एकर गायरानावरील झाडे व आजुबाजुला असलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. सध्या कडक उन्हात सुरु असून, ठिकठिकाणी आगीच्या घटना घडत आहेत. यामुळे शेतकरी अन् नागरिकांनी दक्ष रहाण्याची गरज आहे. सोमवारी (दि.१४) अशीच घटना केज तालुक्यातील आडस, कळमअंबा, मुलेगाव सिमेवरील गायरानला अचानक आग लागली. येथे वाळलेले गवत असल्याने काही क्षणात आग जवळपास १०० एकर मध्ये पसरली ती गायरान लगत असलेल्या शेतापर्यंत पोहोचली होती. » पान २ वर

# शेत दुसऱ्याचे अन् पीक विम्यावर डल्ला तिऱ्याचा

### परळी तालुक्यातील घटना; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**परळी | किसान न्युज**

दुसऱ्याच्या जमिनीवर तिसऱ्यानेच पीक विमा काढून फसवणुकीचा प्रकार पुढे आला आहे. याप्रकरणी पांगरीतील एका शेतकऱ्याने तक्रार दिली असून परळीतील दोन मल्टी सर्व्हिसेस चालक आणि २ शेतकरी अशा चौघांविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पांगरी शिवारातील गट नं ३९ मध्ये शेतकरी अंगद गणपतराव मुंडे यांनी जमीन आहे. त्यांनी २०२२, २०२३ मध्ये सोयाबीन पिकाचा सात एकर तीन गुंठे जमिनीचा पीक विमा ऑनलाईन पद्धतीने भरला होता. त्यानंतर काही दिवसांनी पांगरी येथे पीक विमा कंपनीचे अधिकारी आले. अंगद मुंडे यांना भेटून पीक विमा दोनदा का भरला, अशी चौकशी केली. तेव्हा त्यांनी पीक विमान दोनदा भरला नसल्याचे स्पष्ट केले. अंगद मुंडे यांनी चौकशी केली असता गट क्रमांक ३९ मधून मधुकर भगवानराव भारती (रा. लिंबुटा) यांनी देखील पीक विमा भरल्याचे पुढे आले. त्यानंतर अंगद मुंडे यांनी कृषी अधिकाऱ्यांकडून विम्याबाबत माहिती घेतली असता भलताच प्रकार पुढे आला. पांगरीतील रवींद्र दामोदर मुंडे यांनी त्यांच्या जलालपूर येथील आसावरी मल्टी सर्व्हिसेस येथून जुलै ते सप्टेंबर २०२३ दरम्यान पीकविमा भरला होता. त्यामुळे अंगद मुंडे यांचा विमा रद्द करण्यात आला. त्यामुळे त्यांना पीक विम्याचा ९२ हजारांचा चेक मिळालाच नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर अंगद यांनी परळी शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला. पांगरीत पीक विम्याच्या फसवणुकीचा आणखी एक प्रकार पुढे आला आहे. यामध्ये गावातील शेतकरी अशोक किसनराव मुंडे यांच्या गट क्रमांक ७६ या शेतात धनराज उत्तम चौधर यांनी केदारेश्वर मल्टी सर्व्हिसेसमध्ये कौसाबाई लक्ष्मण राठोड, रा. पांगरी तांडा यांचा पीक विमा भरला. त्यामुळे अशोक मुंडे यांचाही पीक विमा रद्द झाला. असे बोगस प्रकार गावात अनेक शेतकऱ्यांच्या » पान २ वर




# डॉ.थोरात यांचे निलंबन कायम

### स्थगिती देण्यास मॅटचा नकार



**बीड | किसान न्युज**

तत्कालीन बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना शासनाने निलंबित केले. याप्रकरणी डॉ. थोरात मॅटमध्ये गेले होते. पण येथेही त्यांना दिलासा मिळाला नसून मॅटने निलंबन कायम राखले आहे. याप्रकरणी आता २ में ला सुनावणी होणार आहे.कोरोना काळात औषधी व इतर साहित्य खरेदीमध्ये अनियमितता आणि मार्गदर्शक सूचनांचा भंग केल्याबाबत विभागीय चौकशी चालू आहे. बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या विरोधात भ्रष्टाचाराचे आरोप असून त्यांच्या विरोधात चौकशी चालू आहे त्यांना जिल्हा शल्य चिकित्सक या पदावरून निलंबित करण्यात आले असून या निर्णया विरोधात अशोक थोरात यांनी मॅट कोर्टात याचिका दाखल केली असून औषध खरेदी करण्याचे अधिकार माझे नव्हते ते जिल्हाधिकारी यांचे होते असे याचिकेत नमूद करण्यात आले होते. परंतु मॅट कोर्टाने त्यांचे म्हणणे गृहीत धरले नसून त्यांची याचिका फेटाळली आहे व त्यांच्या निलंबनाला स्थगिती देण्यास मॅट चे औरंगाबाद खंडपीठाने नकार दिला आहे. ज्यांनी निलंबन केले त्यांना उत्तर देण्याची संधी देणे आवश्यक असल्याने निलंबन राहीलच असे आदेश मॅटने दिले. याची २ मे २०२५ रोजी अंतिम सुनावणी ठेवली आहे.

# परळीत सोमय्या यांना दाखवीले काळे झेंडे



**परळी | किसान न्युज**

बांगलादेशी घुसखोर नागरिकतेच्या मुद्द्यावरून भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी जन्म प्रमाणपत्र नोंदणीवर आक्षेप घेत राज्यात दौरे सुरू केले आहेत. यापूर्वीही ते बीड येथे आले होते. त्यानंतर किरीट सोमय्या आज परळी शहरात झाले होते. या वेळी मुस्लिम युवकांनी गो बॅक सोमय्या अशा घोषणा देत काळे झेंडे दाखवून निषेध आला. ते येथून परभणीला गेले असल्याचे सांगितले जात आहे.

# खरीप हंगाम पीक विमा खात्यावर जमा

### पण केज तालुक्यात महसूल मंडळ बदललं की, रकमेत बदल; शेतकऱ्यांची माहिती

**केज | किसान न्युज**

खरीप हंगाम २०२४ मधील पीक विमा संदर्भात मोठी ओरड झाल्यानंतर विमा कंपन्या ताळ्यावर आल्या असून, सोमवार (दि.१४) पासून केज तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विमा रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली. पण तालुका एकच असला तरी महसूल मंडळ बदलले की, रकमेत तफावत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. मागील वर्षी खरीप हंगामात सुरवातीला पावसाचा खंड त्यानंतर अतिवृष्टी, तसेच पीक काढणीस आल्यानंतर अतिवृष्टी झाली. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. काही महसूल मंडळात अग्रीह मंजूर झाले तर काही मंडळात नाही. याचीही मोठी ओरड झाली. यानंतर पीक विमा मंजूर करण्यासाठी आंदोलन झाली. यामुळे पीक विमा कंपनी, प्रशासन आणि शेतकरी असा संघर्ष निर्माण झाला होता. या सर्व प्रकारानंतर कसाबसा पीक विमा मंजूर झाल्याचे काही दिवसांपूर्वी वृत्त आले. आता प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विमा रक्कम जमा होत असल्याचे केज तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सांगितले आहे. पण यातही तफावत असल्याची तक्रार आहे. तालुका एक असला तरी महसूल मंडळ बदलले की, नुकसान भरपाईची हेक्टरी रक्कम कमी जास्त प्रमाणात येत आहे. » पान २ वर

# अंभोरा पोलिसांची पुन्हा एकदा धडाकेबाज कारवाई

### ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**आष्टी | किसान न्युज**

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत काल दिनांक १४ रोजी अवैद्य देशी विदेशी दारू विक्री करणाऱ्या पाच ठिकाणी छापा टाकून ३२९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैद्य दारू विक्री करणाऱ्या इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कलम १८५ मोवाका प्रमाणे एकूण पाच गुन्हे दाखल केले असून २२ वाहतूक कारवाया करून १९००० रुपयांचा दंड आकारण्यात आला. या कारवाईमुळे अवैध धंद्यावाल्याचे पुन्हा एकदा धाबे दणाणले असून पोलिसांकडून होणाऱ्या कारवाईने जरब बसेल.

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058

| | |
|---|---|
| सोने २४ कॅरेट | 92,200 |
| २२ कॅरेट | 89,500 |
| चांदी प्रतिकिलो | 97,000 |